Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal
(Journal No. 47023)

ISSN 2319 - 8508

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK

Volume - X, Issue - II
May - October - 2022
ENGLISH / MARATHI

Impact Factor / Indexing
2020 - 6.495
www.sjifactor.com




Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | १९९० नंतरच्या मराठी कविता, दलित कविता वाटा आणि वळणे<br>**अभिजीत झाडे** | १-६ |
| २ | सदानंद देशमुख यांच्या 'महालूट' या कथासंग्रहामधील ग्रामीण स्त्री...<br>**अश्विनी सदाशिवराव मुळे** | ७-१० |
| ३ | आदिवासी फासेपारधी जमातीचे लोकसंस्कृती, लोकसाहित्याचे नाविन्यपूर्ण संशोधन<br>**प्रा. डॉ. सी.डी. पाखरे** | ११-१६ |
| ४ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची आदर्श ग्रामरचना<br>**प्रा. धनराज डी. मुरकुटे** | १७-२० |
| ५ | साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त साहित्यकृती : बारोमास<br>**दिपाली ठावरी** | २१-२४ |
| ६ | समकालीन ग्रामीण कथेला नवे आयाम देणारा कथासंग्रह : इडा पीडा टळो<br>**डॉ. संभाजी शिवाजीराव जाधव** | २५-३० |
| ७ | ज्योती लांजेवार यांची दलित स्त्रीवादी कविता<br>**डॉ. वर्षा गणगणे** | ३१-३६ |
| ८ | ग्रामीण स्त्रीयांचे व्यक्ती चित्रण<br>**राहुन ज्ञानेश्वर खोंडे** | ३७-३९ |
| ९ | मेघदूतम - पंचसंवेदनांचा लोकविलक्षण अविष्कार !<br>**डॉ. स्वानंद गजानन पुंड** | ४०-४१ |
| १० | 'नारदभक्तिसूत्र' आणि 'श्रीमद्भगवद्गीता' मधील भक्तिविषयक साम्यता<br>**प्रा. डॉ. मीनाक्षी सुभाष भांदककर** | ४२-४७ |
| ११ | उज्जयिनी म्हणजे सौंदर्याचा आविष्कार<br>**महेश मारोती पुंड**<br>**प्रा. डॉ. स्वानंद गजानन पुंड** | ४८-५१ |

VOLUME - X, ISSUE - II - MAY - OCTOBER - 2022
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.495 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | 'श्रीवरकृत' जैन राजतरंगिणीच्या प्रथम तरंगात वर्णिलेल्या नैसर्गिक आपत्ती व सामाजिक स्थितीचे थोडक्यात वर्णन'<br>**सौ. सुप्रिया श्रीराम कुळकर्णी**<br>**कु. अनिता रत्नाकर देशपांडे**<br>**प्रा. डॉ. स्वानंद गजानन पुंड** | ५२-६२ |
| १३ | वर्तमानात मूल्यांची पडझड चित्रित करणारी लोकनाथ यशवंत यांची कविता<br>**प्रा. डॉ. प्रफुल्ल गवई** | ६३-६६ |

# १३. वर्तमानात मूल्यांची पडझड चित्रित करणारी लोकनाथ यशवंत यांची कविता

प्रा. डॉ. प्रफुल्ल गवई
एस.पी.एम.टी.एम. महाविद्यालय, चिखली.

आपल्या देशाने जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारून आज वीस वर्षाचा कालावधी उलटून गेला आहे. जागतिककरणाची प्रक्रिया आर्थिक असली तरी, तिचे केवळ आर्थिकच परिणाम झाले असे नाही तर, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक परिणामही आता दिसू लागले आहेत. या परिणामाचे चित्रण अनेक भाषांतील जवळजवळ सर्वच साहित्यप्रकारातून व्यक्त होत आहेत. मराठी साहित्यातील कविता या काव्यप्रकारा मधून बदलत्या काळाच्या पार्श्वभूमीवर मूल्यांची होणारी पडझळ नीरजा, भुजंग मेश्राम, अरुण काळे, प्रज्ञा पवार, महेंद्र भवरे, हेमंत दिवटे, मंगेश काळे, रवींद्र इंगळे, श्रीकांत देशमुख, अजीम नवाज राही, उत्तम कांबळे आणि सुनील अवचार या कवींनी अभिव्यक्त केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने लोकनाथ यशवंत यांच्या नावाचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

लोकनाथ यशवंत यांचे 'आता होऊन जाऊ द्या', 'आणि शेवटी काय झाले', 'पुन्हा चाल करू या' हे तीन काव्यसंग्रह प्रकाशित असून अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात त्यांची कविता समाविष्ट आहे. अखिल मानवजातीच्या कल्याणाचा प्रश्न उपस्थित करणारा हा कवी समाजात मुल्य निर्मितीच्या अपेक्षेने कवितेतून प्रकट होतो. वर्तमान व्यवस्थेचा अमानवीय क्रूर चेहरा आणि मुल्याविहिन संस्कृतीचे विदारक वास्तव त्यांच्या कवितेतून प्रकट होते. 'खाऊजा' च्या धोरणामुळे मानवी जीवन व्यवहाराच्या संकल्पनाच बदलून गेल्या आहेत याचे निरीक्षण नोंदविताना कवी म्हणतो,

'प्रगतीच्या भाकरी मागे
खेड्यातून शहरात आलोत
अस्पृश्यता नाहीशी होण्याच्या बदल्यात
आम्ही झोपड्या पदरात घेतल्या
ही जागतिकीकरणाची कुठली गलिच्छ पद्धत ?
माणसं उंदरासारखी एकमेका वरून धावताहेत ?
या संगणकाच्या तथाकथित प्रगतीत
मी होत्याचं नव्हता झालो
अन् आडवे अंतर उभे ठाकले '
(कोंडमारा, पृष्ठ क्र. २८)

वर्तमान व्यवस्थेत माणूस उपभोक्तावादी व व्यक्तिवादी होत असून मानवी गुणवत्तेला व क्षमतेला बाजारी मूल्ये प्रदान केली जात आहे. नव्या दमणकारी पद्धतीमुळे लोक एकमेकांना चिरडून प्रगतीसाठी धावत आहेत. डॉ. गंगाधर पानतावणे त्यांच्या कवितेचे परीक्षण नोंदविताना म्हणतात, "लोकनाथची कविता मनुष्यत्ववाला मुल्य देणारी कविता आहे. ती प्रकाशगामी आहे. नव्या जगाचा वेध घेणारा हा कवी क्रांतिकारी सामाजिकता व सांस्कृतीकता यात रमणारा आहे. आपल्या आशयघन प्रवासात कवी क्वचितही कुठे स्वतःला विसरला नाही."1 या परिक्षणावरून कवी वर्तमान जीवनात मूल्यांच्या संदर्भात घडून येणारे बदल वर्तमानाच्या परिभाषेत मांडून मनुष्यत्वाला मुल्य देणारा आहे. हे लक्षात येते. वर्तमान व्यवस्थेत भौतिक व बाजारू प्रगतीच्या नादात खूप वेगवेगळ्या समस्या व नवे प्रश्न निर्माण झाल्याचे कवी सूचित करतो. माणसाचे जीवन कवडीमोल झाल्याचे सूचित करतांना लोकनाथ यशवंत म्हणतात,

' जागतिकीकरणात माणसाचे अवमूल्यन झाले
माणूस खूपच स्वस्त झाला....
कोथिंबीर महाग, ताक महाग.
घुसला संगणक विर्यात '
( सुनील खांडेकरांची कविता, पृष्ठ क्र. ६९)

वर्तमान व्यवस्थेत मानवतेच्या मुळाशी असलेली प्रेम, करुणा, मैत्री ही मूल्ये लोप पावत चालली असून व्यवस्थेने माणसालाच वस्तू करून टाकले आहे. त्यामुळे माणसाचे अवमूल्यन होऊन कोथिंबीर आणि ताकापेक्षा माणूस स्वस्त झाल्याचे कवीला वाटते. किशोर सानप लोकनाथ यशवंत यांच्या कवितेचे आकलन मांडतांना, " सामान्य माणसाचं प्रबोधन करून त्याला जगण्याची उभारी देण्याच्या कळवळ्यातून लोकनाथची कविता आकाराला आली आहे."२ मुल्य संस्कारापेक्षा उपभोगाला महत्व देणाऱ्या या वर्तमानात आपले आदर्श न सोडता जगणाऱ्या ची खूपच ओढतान होते. जीवनाच्या प्रत्येक व्यवहाराला बाजारी मूल्ये प्रदान झाली आहेत. सुखोप भोगत मग्न झालेल्या माणसाच्या प्रगतीत खोटेपणा दांभिकता आणि अप्रामाणिकपणा शिरला आहे. कारण प्राथमिक शाळेतील संघर्ष आणि आजीच्या संस्काराचा वर्तमान जीवघेण्या स्पर्धेत टिकाव लागत नाही. यासंदर्भात कवी म्हणतो,

' फोकनाड घरंदाजपणाच्या पदरात लपवून असतात लग्नापूर्वीचे समागम शाबूत;
येऊच देत नाहीत त्या सात्विक चेहऱ्यावर
पिठचाळणीतून चंद्र पाहण्याचे सोंग चालले असते बिनबोभाट '
( गधीचे दूध, पृष्ठ क्र. ८९)

अशी कडवट व तिखट प्रतिक्रिया कवी व्यक्त करतो. येथे कवी जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या बाजारपेठा समाजात ऐहिक सुखाला बाजारपेठा व व्यक्तिवादी मूल्ये बहाल झाली आहे. त्यामुळे सात्विक मुखवटा व उपभोगातील स्वैरपना एकाचवेळी तो धारण करतो. अशा वृत्ती बद्दल कवी येथे चीड व्यक्त करतो.

'मी परिपूर्ण आहे
मी संपूर्ण आहे
मात्र मैदानावर आलो की,
जातच येते आडवी'

जागतिकीकरणानंतर टोकदार होत असलेल्या जात अस्मितेचे प्रखर वास्तव कवीने येथे प्रकट केले आहे. डॉ. आंबेडकरांनी लिहलेल्या भारतीय संविधानामुळे बंधुत्वाचे मूल्य येऊन जात संपुष्टात आली. परंतु आज बहुतेक व्यक्ती जातीच्या आधारावर मजबुतपणे उभा असून जात अस्मिता जास्त टोकदार होत असल्याचे कवी चित्रित करतो. जागतिकीकरणात मूल्यांची पडझड होत असलेली बघून कवी,

' कुठले आदर्श मुलासमोर ठेऊ
सांगा साने गुरुजी'
( इतिहास, पृष्ठ क्र. ३५)

असा थेट सवाल ते विचारतात. सभोवतालचे मुल्यहीन, आदर्शहीन, संस्कारहिन जिणे बघून कवी म्हणतो,

' मी पोराला कोणत्या भाषेत समजावू?
डॉक्टरांसारखे गोड गोड बोलत जा...
चामड्या सहित रोग्यांचे खिसे कापत जा..
देशप्रेमा च्या लंब्या चवड्या बाता कर
संधी मिळाली तर अमेरिकेत स्थायिक हो..
जोरदार स्वदेशीचा नारा दे - फ्रान्सचा परफ्यूम लावून
कॉम्प्युटर चे उद्घाटन होऊ दे..
सत्यनारायण ने नारळ फोडून
विद्यापीठ बसलेच आहे
ज्योतिषाची पदवी द्यायला
लोकांना खोटी स्वप्ने दाखवीत जा..!
मुर्खांना कर्मकांडात लावून ठेव. '
(वडीलाने मुलाला पोस्ट न केलेले पत्र, पृष्ठ क्र. १००)

अशाप्रकारे वर्तमान व्यवस्थेचा मुखवटा उघडा करून कवी आपल्या मुलाला म्हणतो, ही कविता

' बालपणापासून शिकवलेले मानवी आदर्श
चूक की बरोबर हा निर्णय मी राखून ठेवतो
ती माझी मर्यादा आहे
पण तू एखादा मुखवटा निवडला पाहिजेस

अशी माझी इच्छा आहे'

(वडीलाने मुलाला पोस्ट न केलेले पत्र, पृष्ठ क्र. १०६)

बाप म्हणून मुलावर केलेले आदर्शाचे मुल्य संस्कार जागतिकीकरणाच्या रेट्यात कुचकामी ठरत आहे. त्यामुळे अशा मुल्यहिन जगण्याच्या स्पर्धेत मुलगा टिकावा म्हणून मुलाने ही एखादा मुखवटा लावून यशस्वी व्हावं अशी बाप म्हणून कवी इच्छा व्यक्त करतो. वर्तमान व्यवस्थेत माणूस अर्थहीन जगत असताना कवीने त्यात कसे सहभागी व्हावे? बालपणापासून शिकलेले शिकविलेले सगळे आदर्श मुल्य चूक कसे म्हणायचे ? अर्थहीन , मुल्यहिन आदर्शहिन जगणारा समाज अधपतीत होतच असतो याचे चांगले भान कवीला असल्यामुळे अर्थपूर्ण , मुल्य युक्त , आदर्शवादी जीवन जगणारा कवी अर्थपूर्ण जगण्याचे भान वाचकांना आणून देतो.

सारांश

जागतिककरणामुळे समकालीन जीवन व्यवहारात जाणवू लागलेली पडझड, सामाजिक जीवनातील विसंगती, व मुल्य व्यवहारातील घुसळण वर्तमानाच्या परिभाषेत मांडणारी लोकनाथ यशवंत यांची कविता जागतिकीकरणाच्या काळातील संवेदनांची कविता आहे.

निष्कर्ष

१. जागतिककरणामुळे समकालीन जीवन व्यवहारात जाणवू लागलेली पडझड मांडणारी ही कविता आहे.
२. मानवी जीवनातील विसंगती, व मुल्य व्यवहारातील घुसळण वर्तमानाच्या परिभाषेत मांडणारी ही कविता आहे.
३. ही कविता जागतिकीकरणाच्या काळातील मानवी संवेदना व्यक्त करते.
४. जात अस्मिता टोकदार होत असल्याचे सूचन ही कविता करते.

संदर्भ

१. लोकनाथ यशवंत, आता होवून जाऊ द्या!, यशश्री प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १७
२. मेघमाला मेश्राम, ( संपा.) यशवंत कविता लोकनाथ ची, अवेमरिया प्रकाशन , पुणे, प्र. आ. २०१३, पृ क्र. ९२
३. लोकनाथ यशवंत: आणि शेवटी काय झाले?, यमक प्रकाशन नागपूर, प्र. आ. १९९५,
४. लोकनाथ यशवंत: पुन्हा चाल करू या, यंग इंडिया प्रकाशन मुंबई, प्र. आ. २००९